# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः07.11.2024** **वारःगुरुवार**

---

1. अमेरिकेच्या अध्यक्षपदाच्या निवडणुकीत विजयाबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडून डोनाल्ड ट्रंप यांचं अभिनंदन. भारत-अमेरिका संबंध मजबूत करण्यासाठी ट्रंप यांच्याबरोबर पुन्हा काम करण्यासाठी इच्छुक असल्याचं प्रतिपादन.
2. गुणवंत विद्यार्थ्यांना आर्थिक आधार देण्यासाठी केंद्र सरकारकडून पीएम-विद्यालक्ष्मी योजनेला मंजुरी.
3. नवी दिल्लीत आजपासून राष्ट्रीय तपास संस्थेतर्फे दहशतवादविरोधी परिषद. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आज संबोधित करणार.
4. भारतीय रेल्वेतर्फे गेल्या 46 दिवसांमध्ये 4 हजार 521 विशेष रेल्वे फेऱ्यांच्या माध्यमातून 65 लाख प्रवाशांची ने-आण. चार नोव्हेंबरला एकाच दिवसात 120 लाख प्रवाशांची ने-आण करण्याचा विक्रम.
5. हेलसिंकी इथं सुरू असलेल्या एचपीपी खुल्या टेनिसमध्ये भारताचा दिवीज शरण आणि त्याचा इस्राईली साथीदार डॅनिएल कुकीरमॅन यांचा पुरुष दुहेरीच्या उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश.

**<u>मोदी ट्रंप फोन</u>**

अमेरिकेच्या अध्यक्षपदाच्या निवडणुकीत मोठा विजय मिळवल्याबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल डोनाल्ड ट्रंप यांच्याशी संवाद साधला आणि अभिनंदन केलं. तंत्रज्ञान, संरक्षण, ऊर्जा, अवकाशविज्ञान यांच्यासह इतर अनेक क्षेत्रांमध्ये भारत-अमेरिका संबंध मजबूत करण्यासाठी ट्रंप यांच्याबरोबर पुन्हा काम करण्यासाठी इच्छुक आहोत असं मोदी यांनी समाजमाध्यमांवरच्या संदेशात म्हटलं आहे. दोन्ही नेत्यांनी जागतिक शांततेसासाठी काम करण्याबाबत कटिबद्धता व्यक्त केली. सर्व जग मोदी यांच्यावर प्रेम करतं आणि आपल्या विजयानंतर संवाद साधणाऱ्या आंतरराष्ट्रीय स्तरावरील पहिल्या काही नेत्यांपैकी मोदी एक आहेत, असं ट्रंप यावेळी संभाषणादरम्यान म्हणाले. मोदी आणि भारताला आपण खरा मित्र मानतो, असंही ट्रंप यांनी नमूद केलं.

**<u>केंद्रिय मंत्रीमंडळ निर्णय</u>**

गुणवंत विद्यार्थ्यांना आर्थिक पाठबळ देण्यासाठी केंद्र सरकारनं पीएम-विद्यालक्ष्मी योजनेला मान्यता दिली आहे. या निर्णयाची माहिती देताना केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव म्हणाले की, उच्च शिक्षण घेण्यासाठी विद्यार्थ्यांना तारणमुक्त आणि विना-हमीदार कर्ज मिळण्यास ते पात्र असतील. आर्थिक अडचणींमुळं भारतातील कोणताही तरुण दर्जेदार उच्च शिक्षण घेण्यापासून वंचित राहू नये यासाठी ही योजना सुरू करण्यात आली आहे. सरकारनं भारतीय अन्न महामंडळासाठी 10 हजार 700 कोटी रुपयांचं नवीन भांडवल देण्याचाही निर्णय घेतला आहे. या निर्णयाचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्वागत केलं आहे. नवीन भांडवलामुळे एफसीआयची धान्यखरेदी आणि वितरणाची क्षमता वाढायला मदत होईल, असं त्यांनी समाजमाध्यमांवरच्या संदेशात म्हटलं आहे. पीएम विद्यालक्ष्मी योजना ही युवाशक्तीच्या सशक्तीकरणाच्या आणि देशाच्या उज्ज्वल भविष्याची बांधणीच्या दृष्टीनं महत्त्वाचं पाऊल असल्याचंही त्यांनी म्हटलं आहे.

**<u>दहशतवाद विरोधी परिषद</u>**

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आज नवी दिल्लीत दहशतवादविरोधी परिषदेला संबोधित करणार आहेत. दोन दिवसांची ही परिषद राष्ट्रीय तपास संस्था म्हणजे एनआयएनं आयोजित केली आहे. दहशतवादाशी लढण्यासाठी सरकारी पातळ्यांवरील सर्व संस्थांमध्ये समन्वय तयार करणं आणि भविष्यातील धोरणांसाठी योग्य माहिती एकत्रित करणं हा या परिषदेचा मुख्य उद्देश आहे. देशाला दहशतवादमुक्त बनवण्यासाठी मोदी सरकार पूर्ण कटिबद्ध असल्याचं शहा यांनी समाजमाध्यमांवरच्या संदेशात म्हटलं आह. दोन दिवसांची ही परिषद देशाची सुरक्षा बळकट करण्यासाठी विविध संस्थांमधला समन्वय वाढवायला मदत करेल, असंही त्यांनी नमूद केलं आहे.

**<u>छटपूजा शुभेच्छा</u>**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी छटपूजेनिमित्त नागरिकांना शुभेच्छा दिल्या आहेत. छटपूजा हा देशातल्या सर्वांत प्राचीन सणांपैकी एक असून, सूर्याचं पूजन करण्याची ती संधी आहे असं त्यांनी समाजमाध्यमांवरच्या संदेशात म्हटलं आहे. हा सण नद्या आणि तलावांबाबत कृतज्ञता व्यक्त करतो आणि उपवासाच्या माध्यमातून मन आणि आत्मा शुद्ध करतो असंही त्यांनी म्हटलं आहे. हा सण पर्यावरणाचं रक्षण करण्याचीही प्रेरणा देतो, असंही त्यांनी नमूद केलं आहे.

**<u>रेल्वे फेऱ्या</u>**

भारतीय रेल्वेनं गेल्या 46 दिवसांमध्ये 4521 विशेष रेल्वे फेऱ्यांच्या माध्यमातून 65 लाख प्रवाशांची ने-आण केली आहे. छटपूजा सणाच्या निमित्तानं येत्या 8तारखेपासून 11 तारखेपर्यंत आणखी 160 विशेष रेल्वेही फेऱ्यांचंही नियोजन करण्यात आलं आहे. गेल्या सोमवारी म्हणजे चार नोव्हेंबरला एकाच दिवसात 120 लाख प्रवाशांची ने-आण करून रेल्वेनं एका दिवसात सर्वाधिक प्रवाशांची ने-आण करण्याचा विक्रम केला आहे. या दिवशी वीस लाख आरक्षित आणि एक कोटी अनारक्षित प्रवाशांची ने-आण करण्यात आली, असे रेल्वेनं प्रसिद्ध केलेल्या निवेदनात म्हटलं आहे. रेल्वेनं 1 ऑक्टोबर ते 30 नोव्हेंबर या काळात एकंदर 7600 विशेष रेल्वे फेऱ्यांचं नियोजन केलं आहे. या फेऱ्या गेल्या वर्षीपेक्षा 73 टक्क्यांनी जास्त आहेत. उत्तर प्रदेश, बिहार, पश्चिम बंगाल आणि ओडिशाकडे पश्चिम रेल्वेतर्फे 375 विशेष रेल्वे फेऱ्या सोडण्यात येत आहेत. या फेऱ्या व्यवस्थितपणे पार पाडण्यासाठी आणि वेळापत्रकावर देखरेख ठेवण्यासाठी विशेष नियंत्रण कक्ष स्थापन करण्यात आल्याचं पश्चिम रेल्वेचे मुख्य जनसंपर्क अधिकारी विनीत अभिषेक यांनी सांगितलं आहे.

**<u>निवडणूक रोख जप्त</u>**

विधानसभा निवडणुका, तसंच पोटनिवडणुका सुरू असलेल्या महाराष्ट्र, झारखंड आणि इतर राज्यांमधून निवडणूक आयोगाच्या संस्थांनी आत्तापर्यंत पाचशे 58 कोटी रुपयांची रोकड, मद्य, वाटपाच्या वस्तू, अमली पदार्थ आणि मौल्यवान धातू जप्त केले आहेत. महाराष्ट्रात विविध कारवाईमंध्ये 280 कोटी रुपयांचा, तर झारखंडमध्ये 158 कोटी रुपयांचा माल जप्त करण्यात आल्याचं निवडणूक आयोगानं म्हटलं आहे. महाराष्ट्र आणि झारखंडमध्ये 2019 मध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीच्या तुलनेत ही रक्कम तिप्पट असल्याचं निवडणूक आयोगानं नमूद केलं आहे. निवडणुकांदरम्यान रोकड आणि विविध वस्तूंचं बेकायदा वाटप करणाऱ्या कोणाबाबतही हयगय करू नये असे स्पष्ट निर्देश मुख्य निवडणूक अधिकारी राजीवकुमार यांनी सरकारी अधिकाऱ्यांना दिले आहेत.

**<u>योगी-वाशिम</u>**

विधानसभेसाठी महाराष्ट्रात सगळ्याच राजकीय पक्षांकडून प्रचाराला वेग आला आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांची प्रेरणा घेऊन एकजुट होऊन  हिंदूंनी राष्ट्रविरोधी शक्तीच्या विरोधात लढा द्यावा असं आवाहन उत्तर प्रदेशचे

मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी काल वाशिम इथं जाहीर सभेत केलं. महाविकास आघाडीद्वारे लोकसेवेची पंचसुत्री काल मुंबईत वांद्रे इथं झालेल्या संयुक्त जाहीर सभेत प्रकाशित करण्यात आली. शेतकऱ्यांचे 3 लाखापर्यंतचं कर्जमाफ, महिलांना 3000 रुपये महिना आणि मोफत बसप्रवास, बेरोजगारांना 4 हजार रुपये महिना भत्ता, कुटुंबाला 25 लाखांचा आरोग्य विमा अशी वचनं यामध्ये देण्यात आली आहेत. या सभेला काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे, लोकसभेतील विरोधी पक्ष नेते राहुल गांधी, यांच्यासह महाविकास आघाडीचे राज्यातले प्रमुख नेते आणि पदाधिकारी उपस्थित होते. राज्यघटना हे केवळ पुस्तक नसून जीवनपद्धती आणि तत्त्वज्ञान असल्याचं राहुल गांधी यांनी नागपुरात आयोजित संविधान सन्मान परिषदेत बोलताना सांगितलं.

**<u>रिझर्व्ह बँक केवायसी</u>**

रिझर्व्ह बँकेनं ग्राहकाची ओळख पटवण्याच्या म्हणजे केवायसीबाबत काही नियमांमध्ये बदलांची घोषणा केली आहे. नवीन नियमांनुसार एखाद्या ग्राहकानं बँकेत केवायसी प्रक्रिया पूर्ण केली असेल, तर त्याला त्याच बँकेत नवीन खातं उघडताना किंवा नवीन उत्पादन किंवा सेवा घेताना पुन्हा ओळखपडताळणीसाठी कस्टमर ड्यू डिलिजन्स म्हणजे सीडीडीसाठी अर्ज करण्याची आवश्यकता नसेल. बँकेनं ग्राहकांकडून कोणतीही अतिरिक्त किंवा सुधारित माहिती घेतल्यास ती केंद्रीय केवायसी नोंदणीकेंद्रात सात दिवसांच्या आत उपलब्ध करून द्यावी, असंही रिझर्व्ह बँकेनं म्हटलं आहे.

**<u>हेजबोला हल्ला</u>**

हेजबोलानं काल मध्य आणि उत्तर इस्राईलवर दहा क्षेपणास्त्रांचा मारा केला. त्यातलं एक क्षेपणास्त्र तेल अविवजवळच्या बेन गुरियन आंतरराष्ट्रीय विमानतळावर पडल्याचं इस्राईलनं म्हटलं आहे. हे क्षेपणास्त्र रिकाम्या पार्किंग भागात पडल्यामुळे त्यात कोणी जखमी झालं नाही. दरम्यान, लेबनॉननं इस्राईलच्या हल्ल्यांबाबत संयुक्त राष्ट्रांच्या सुरक्षा परिषदेत तक्रार केली आहे आणि शस्त्रसंधीची मागणी केली आहे.

**<u>जर्मनी अर्थमंत्री</u>**

जर्मनीचे चॅन्सेलर ओलाफ शोल्झ यांनी अर्थमंत्री ख्रिस्टियन लिंडनर यांना मंत्रिमंडळातून काढून टाकलं आहे. युतीतील सहकाऱ्यांबरोबर वाढलेल्या वादाच्या पार्श्वभूमीवर शोल्झ यांनी हा निर्णय काल पत्रकार परिषदेत जाहीर केला. बुंडेस्टॅग या जर्मन संसदेत पुढच्या वर्षी पंधरा जानेवारीला विश्वासदर्शक ठराव मांडणार असल्याचंही शोल्झ यांनी सांगितलं.

**<u>एचपीपी टेनिस</u>**

फिनलंडमधील हेलसिंकी इथं सुरू असलेल्या एचपीपी खुल्या टेनिसमध्ये भारताच्या दिवीज शरण आणि त्याचा इस्राईली साथीदार डॅनिएल कुकीरमॅन यांनी पुरुष दुहेरीच्या उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश मिळवला आहे. त्यांनी काल रात्री झेशियाचा मॅटेज व्होसेल आणि डेन्मार्कचा जोहान्स इंगिलसेन यांचा 7-6, 7-5 असा सरळ सेटमध्ये पराभव केला. दिवीज आणि डॅनिएलचा सामना आज रात्री इटलीचा मार्को बोर्टोलोट्टी आणि फिनलंडचा पॅट्रिक निकलास साल्मिनेन याच्याशी होणार आहे.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं. नमस्कार.